**दिनांक ११/०१/२०२४ रोजीची मा. श्री चिन्मय गोतमारे जिल्हाधिकारी, गोंदिया अध्यक्षतेखाली झालेल्या निर्यात प्रचालन समिती सभेचे इतिवृत्त**

---

सभेत खालील प्रमाणे अधिकारी व औद्योगीक संघटणाचे प्रतीनिधी हजर होते-

१. चिन्मय गोतमारे, मा. जिल्हाधिकारी, गोंदिया
२. श्री. बि. एम. शिवणकर, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, गोंदिया
३. हुकूमचंद अग्रवाल, अध्यक्ष MIDC असोसिएशन, गोंदिया
४. गजानन अग्रवाल, लाख इंडस्ट्री असोसिएशन, गोंदिया
५. एस. पी. हारगोडे, उपभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, गोंदिया
६. नरेंद्र राहांगडाले, MSRLM गोंदिया
७. नरेश श. मडावी, राज्यकर अधिकारी, GST विभाग, गोंदिया
८. धनराज तुमडाम, कृषी उपसंचालक,कृषी विभाग, गोंदिया
९. अनमोल जैन गोंदिया, अभियंता, MSEDCL गोंदिया
१०. कुणाल गोंडचवर गोंदिया, व्यवस्थापक, गोंदिया

१. **ICD स्थापन करणेबाबत**- राईस मिल असोसिएशनला आयसीडी चा सविस्तर प्रस्ताव महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र, गोंदिया यांना सादर करण्याचे सूचना मा. अध्यक्षांनी केली. राईस मिल असोसिएशन चा प्रस्ताव प्राप्त झाल्याबरोबर रेल्वे विभागाला प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र, गोंदिया यांना मा. अध्यक्षांनी केली.

२. **राईस उद्योगास हंगामी उद्योगाचा दर्जा देणे** - मा. अध्यक्षांनी सदर बाब शासन स्तरावरील असल्याने तसे निवेदन मा. जिल्हाधिकारी, गोंदिया यांना देण्याबाबत राईस मिल असोसिएशनला सूचना केली. राईस मील असोसिएशनचा प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी सादर केला किंवा नाही हे तपासून पाहण्याच्या सुचना मा. अध्यक्षांनी दिल्या.

३. **धानाचे उपउत्पादनातून मिळणाऱ्या राखेच्या उपयोगाबाबत** -- श्री. हुकूमचंद अग्रवाल यांनी धानाचे उपउत्पादनातून मिळणाऱ्या राखेचा उपयोग शेती करताना केल्यास जमिनीची उत्पादकता वाढू शकेल असे सांगितले. कृषी विज्ञान केंद्र, हिवरा यांना याबाबत वैद्यानिक माती परीक्षण करून अहवाल देण्याच्या सूचना मा. अध्यक्षांनी दिल्या. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी गोंदिया यांना याबाबत पाठ पुरावा करण्याच्या सुचना मा. अध्यक्षांनी दिल्या.

Scanned with CamScanner

४. **जी आय मानांकन-** केशोरी मिरची करिता जी आय मानांकन मिळण्याचे दृष्टीने प्रस्ताव करून संबंधित यंत्रणेकडे पाठवण्याचे निर्देश मा. अध्यक्षांनी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी गोंदिया यांना दिले. जी आय मानांकन करीता निधी प्रस्ताव DPDC गोंदिया यांचेकडे सादर करण्यात आला आहे.

पुढील सभेपासून वन विभागाला बैठकीचे निमंत्रण देण्याबाबत मा. अध्यक्षांनी सुचना दिली.

सभेच्या शेवटी उपस्थितांचे आभार माणुन सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले.

महाव्यवस्थापक
जिल्हा उद्योग केंद्र, गोंदिया

मा. जिल्हाधिकारी,
गोंदिया

Scanned with CamScanner